# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 500/2020 दिनांक: 13 /06/2020

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 31 मे 2020
9. या कार्यालयाचे आदेश क्र2कक्ष./प्रसकावि/गृह/-361/2020 दिनांक 31.05.2020
10. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 कलम 144
11. व्यवस्थापक, महाउर्जा, अकोला यांचे इमेल संदेश दिनांक २५.५.२०२०

## आदेश

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे .**आणि**

**ज्याअर्थी** महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र. स्पष्टीकरण No.DMU/ 2020/ CR.92/ DisM-1 दिनांक 31 मे 2020 मध्ये नमूद केल्यानुसार **दिनांक 30.06.2020 पर्यंत लॉकडाऊन चा कालावधी वाढविण्यात आला असून मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. आणि**

**ज्याअर्थी,** संदर्भीय पत्र क्र. 11 अन्वये जिल्हातील अपारंपारीक उर्जा प्रकल्प उभारणीचे प्रलंबितकामे पूर्ण करण्याकरिता परवानगीसाठी विनंती केली आहे. तसेच प्रलंबित असलेली कामे ज्या कंत्राटदारांकडून करण्यात येणार आहे त्या कंत्राटदारांना कामे करण्यायास परवानगी प्रदान करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**त्याअर्थी** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला**, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 , फौजदारी प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार व्यवस्थापक, महाउर्जा यांनी त्यांचे प्रस्तावात नमूद केल्यानुसार तसेच सदरची कामे ही राष्ट्रहिताच्या दृष्टीने अत्यावश्यक बाब असल्यामुळे जिल्हातील अपारंपारीक उर्जा प्रकल्प उभारणीचे प्रलंबितकामे पूर्ण करण्याकरिता ज्या कंत्राटदारांना सदरची कामे करण्याकरिता महाउर्जा कंपनीने कंत्राट दिले आहेत अशा कंत्राटदारांकडून कामे पूर्ण करुन घेण्याकरिता खालील अटी व शर्तीचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कामगार यांना मास्क, हॅन्डग्लोज, सॅनिटायझर व इतर प्रतिबंधात्मक साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे. व त्यांचा संबंधीतांनी वापर करणे बंधनकारक राहील.
२. काम सुरु करण्यापूर्वी कामाबाबत संबंधीत पोलीस विभागास कळविण्यात यावे.
३. संबंधित ठिकाणी कमीत कमी कामगार काम करतील याची दक्षता घ्यावी. कामाचे ठिकाणी त्यांनी एकत्रित न येता वेगवेगळे संच तयार करुन काम करावे.
४. सदरचे काम करीत असतांना कामगारांमध्ये सुरक्षीत अंतर ठेवण्यात यावे.
५. काम करित असेलल्या कर्मचा-यांमध्ये सर्दी, खोकला, ताप व श्वास घेण्यास त्रास असल्यास त्यांना तात्काळ रुग्णालयामध्ये तपासणी करीता घेवून जावे.
६. या कार्यालयाकडून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचा तसेच कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

NitinN 451